दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता






vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.२१ मार्च २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २०३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 21 March 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 203 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# अखेर अंधश्रदा कर्मकाडांकडून राजीनामा!

## महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांचा राजीनामा:उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडे सोपवला



**नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाला आता मोठे राजकीय वळण लागले असून, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा खरातची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ आणि त्याच्यासोबतचे काही फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहेत. या गंभीर प्रकारामुळे चाकणकर यांच्यावर चोहोबाजूंनी टीकेची झोड उठली होती. तसेच विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची आग्रही मागणी लावून धरली होती. अखेर सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन चाकणकरांनी राजीनामा दिला असल्याचे समोर आले आहे. तसेच वैयक्तिक कारणाने राजीनामा देत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

### लवकरच मी सविस्तर भूमिका मांडेल– रुपाली चाकणकर

**पदाचा राजीनामा दिल्यानंतर रुपाली चाकणकर यांनी ट्विट करत म्हटले की, आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, आमच्या नेत्या तसेच राज्याच्या सन्माननीय उपमुख्यमंत्री आदरणीय सुनेत्रावाहिनींकडे माझ्याकडे असलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा सुपूर्द केला.सध्या विविध माध्यमातून होत असलेल्या आरोपांची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने चौकशी व्हावी म्हणून नैतिक जबाबदारी स्वीकारत मी हा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत योग्य तो निर्णय आदरणीय सुनेत्रावहिनी घेतील! या प्रकरणाबाबत लवकरच मी सविस्तर भूमिका मांडेल.**

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना आपले पद गमवावे लागले असून, राष्ट्रवादी काँग्रेसने शुक्रवारी सकाळीच त्यांना राजीनामा देण्याच्या सूचना केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानुसार चाकणकर यांनी प्रथम महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून, आता त्या राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा देणार असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.रुपाली चाकणकर यांनी नुकतीच पुणे डीजींची भेट घेतली होती. तसेच सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी जाण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांनी वर्षा बंगल्यावर भेट घेतली होती. त्यानंतर रात्री उशिरा चाकणकर यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली व या भेटीत त्यांनी राजीनामा दिला आहे.



# मोलगी परिसरात प्रवाशांना लुटणारी टोळी सक्रिय
# चाकूचा धाक दाखवून ५७ हजारांचा मुद्देमाल लंपास

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

नंदुरबार जिल्ह्यातील मोलगी पोलीस ठाणे हद्दीत प्रवाशांना निर्जन ठिकाणी नेऊन चाकूचा धाक दाखवत लुटल्याची खळबळजनक घटना घडली आहे. अज्ञात ७ ते ८ दरोडेखोरांनी फिर्यादीचे वाहन अडवून मारहाण करण्याची धमकी देत रोख रक्कमेसह महागडे मोबाईल हिसकावून पोबारा केला. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक . दीपक जयसिंग पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

परभणी जिल्ह्यातील पाथरी येथील रहिवासी असलेले फिर्यादी प्रविण रमेश सोळुंके (वय ३५) हे आपल्या वाहनाने जात असताना १८ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास मोलगी गावापासून ७ ते ८ किमी अंतरावर दबा धरून बसलेल्या टोळीने त्यांचे



वाहन अडवले. अजय नावाच्या तरुणासह त्याच्या इतर ६ ते ७ साथीदारांनी फिर्यादी व साक्षीदारांना बळजबरीने एका निर्जन टेकडीवर नेले.टेकडीवर नेल्यानंतर आरोपींनी फिर्यादीला चाकूचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. दरोडेखोरांनी खिशातील ६,००० रुपये रोख आणि दोन महागडे 'रेडमी' कंपनीचे मोबाईल (किंमत ५१,७०० रुपये) असा एकूण ५७,७०० रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने हिसकावून घेतला. या टोळीत २५ ते ३० वयोगटातील ७ ते ८ तरुणांचा समावेश असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या घटनेची गांभीर्याने दखल घेत सहाय्यक पोलीस निरीक्षक . दीपक जयसिंग पावरा यांच्या आदेशान्वये मोलगी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१० (२), ३११ आणि ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याची नोंद पोलीस हवालदार वानसिंग पाडवी केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास दीपक जयसिंग पावरा स्वतः करत आहेत.दुर्गम भागात दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शिवनी (जा) साखर कारखाना येथे रुद्राभिषेक व भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

महाराष्ट्राचे माजी मंत्री व विद्यमान आमदार अमित विलासरावजी देशमुख यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दिनांक २१ मार्च २०२६ रोजी शिवनी येथील श्री जिरगा मारुती मंदिर परिसरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.सकाळी ७ ते ९ या वेळेत श्रींचा रुद्राभिषेक होणार असून, त्यानंतर सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. विनोदाचार्य मधुकर महाराज सायाळकर यांचे भव्य कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

या कीर्तन सोहळ्यास ह.भ.प. प्रमाण




कंठ कैलास महाराज पौळ फरकंडेकर, ह.भ.प. गायनाचार्य बाळासाहेब कुलकर्णी दस्तापुरकर, ह.भ.प. मृदंग सेवक बालाजी पाटील जामगे (जामगा शिवनीकर), ह.भ.प. गायनाचार्य अमोल महाराज वानखेडे पेनुरकर, ह.भ.प. गायनाचार्य रामभाऊ जगताप दारेफळकर, ह.भ.प. एकनाथ गुरुजी पोळ (श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्था, फरकंडा), तसेच शिवाराष्ट्रीय भूषण उत्कृष्ट मृदंगाचार्य कपिल महाराज भालके व ह.भ.प. मृदंग सेवक हरी ओम पाटील जामगे (जामगा शिवनीकर) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.कार्यक्रमानंतर दुपारी १ वाजल्यापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा अभिष्टचिंतन सोहळा ट्वेंटीवन शुगर लिमिटेड साखर कारखाना, जिरगा मारुती नगर, शिवनी (जा), ता. लोहा येथे पार पडणार आहे. या कीर्तन सोहळ्याचा पंचक्रोशीतील वारकरी, शेतकरी बांधव, भजनी मंडळे व श्रुती मंडळींनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन कारखान्याचे सर्व कर्मचारी बांधव यांनी केले आहे.

# दुकानासमोर मुलाने दुचाकीचा हॉर्न का वाजवीला?म्हणुन बाप लेकाला लोखंडी रॉडने मारहाण



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तुझ्या मुलाने माझ्या दुकानासमोर दुचाकीचा हॉर्न का वाजवीला ?अशी कुरापत काढून काशीदवाडी येथील पिता,पुत्रांना लाथा, बुक्क्याने मुक्का मार देऊन,व लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केल्या प्रकरणी महादेव जाधवर यांच्या फिर्यादी वरून बाप,लेकासह तिघांविरुद्ध केज पोलिस ठाण्यात गुरूवार दि.१९ मार्च रोजी सायंकाळी गून्हा दाखल झाला आहे.

केज तालुक्यातील काशीदवाडी येथील एका किराणा दुकाना समोर तुझ्या मुलाने दुचाकीचा हॉर्न का वाजवीला?अशी कुरापत काढून बाप, लेकाला लाथा,बुक्क्याने मुक्का मार देऊन व लोखंडी रॉडने मारहाण करून,आमच्या नादाला लागलास तर तुला जीवे मारून टाकीन अशी जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी महादेव जयद्रथ जाधवर यांच्या फिर्यादी वरून केज पोलिस ठाण्यात अशोक भगवान जाधवर,सुमित अशोक जाधवर या बाप लेकासह दादा वशिष्ठ जाधवर तिघेही रा.

काशीदवाडी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार हनुमान मुंडे हे पुढील तपास करीत आहेत.

# बनावट विमा पॉलिसी देऊन ट्रक चालकाची सव्वा लाखांची फसवणूक

## शहाद्याच्या 'त्या' एजंटवर तळोदा पोलिसांत गुन्हा

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी.**

विमा एजंट असल्याचे भासवून एका कष्टकरी ट्रक चालकाला बनावट विमा पॉलिसी देऊन हजारो रुपयांचा गंडा घातल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. चोला मंडलम कंपनीची बोगस पॉलिसी तयार करून विश्वासघात केल्याप्रकरणी शहादा येथील एका संशयिताविरुद्ध तळोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेने विमा क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

बोरद (ता. तळोदा) येथील रहिवासी आणि व्यवसायने ट्रक चालक असलेले संदीप जयसिंग राजपूत (वय ३९) यांनी त्यांच्या मालकीच्या टाटा मोटर्स कंपनीच्या ट्रकच्या (क्र. चक-१८ / च-७६९७) वार्षिक विम्यासाठी संशयित आरोपी सतिष राजेंद्र चित्रकथे (रा. मुरली मनोहर कॉलनी,




मलोनी ता. शहादा) याच्याशी संपर्क साधला होता. संशयिताने स्वतःला विमा एजंट भासवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.संशयिताने चोला मंडलम एम.एस. जनरल इन्शुरन्स कंपनीची बनावट पॉलिसी तयार करून ती खरी असल्याचे फिर्यादीला भासवले. यासाठी त्याने ७ नोव्हेंबर २०२४ रोजी फोन-पे च्या माध्यमातून १४,००० रुपये आणि ८ नोव्हेंबर २०२४ रोजी रोख २०,२६० रुपये, असे एकूण ३४,२६० रुपये उकळले. फिर्यादीला विमा उतरवल्याची पावती दिली, मात्र ती कागदोपत्री बोगस असल्याचे नंतर समोर आले.काही दिवसांनी सदर विमा पॉलिसी बनावट असल्याचे संदीप राजपूत यांच्या निदर्शनास आले. त्यांनी संशयित सतिष चित्रकथे याला या फसवणुकीबाबत विचारणा केली असता, त्याने पैसे परत करण्याऐवजी फिर्यादीला अश्लील शिवीगाळ केली. इतकेच नव्हे तर जास्त बोलला तर जीवे ठार मारून टाकीन, अशी धमकीही दिली.फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने तळोदा पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. या तक्रारीवरून संशयित आरोपी सतिष चित्रकथे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६०, २९, ३३५, ३३६(२), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तळोदा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक राजन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश निकम या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. अशा प्रकारे बनावट विमा पॉलिसी देणाऱ्या टोळ्या सक्रिय असण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून वाहनधारकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# संपादकीय

## ‘भव्य’त्वाची येवो प्रचिती



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या २०२६-२७च्या अर्थसंकल्पात ‘भारत औद्योगिक विकास योजना’ जाहीर केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाने त्यास बुधवारी दिलेली मंजुरी हे देशातील औद्योगिक उत्पादनवाढीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असे पाऊल आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला योजनांना नावे देताना त्यांतून भव्यतेची भावना ध्वनित व्हावी, असे वाटत असते. त्या शिरस्त्यानुसार या योजनेच्या इंग्रजी नावातील आद्याक्षरांना अनुसरून त्याचे देवनागरीतील लघुरूप ‘भव्य’ असे होते व तेच आता रूढ होईल. अर्थात, या अशा शब्दांच्या खेळात अडकण्याची गरज नाही. या शब्दांच्या पलीकडे जाऊन देशाच्या हाती काय पडते, हे महत्त्वाचे.आजच्या काळात सेवा क्षेत्र हे कुठल्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यकच. आपल्या देशाच्या जीडीपीमध्ये या क्षेत्राचा सध्याचा वाटा साधारण ५५ टक्क्यांच्या आसपास आहे. तुलनेत उत्पादन क्षेत्राचा वाटा साधारण १६ ते १७ टक्के. हा आकडा येत्या चार वर्षांत २५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे केंद्राचे लक्ष्य आहे. त्यास अनुसरून काही पावले टाकली जात आहेत. ‘भव्य’ योजनेसाठी ३३,६६० कोटी रुपये मंजूर करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय म्हणजे त्यातलेच एक पाऊल. सध्याची देशातील परिस्थिती व आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता अशा योजनांची गरज होती व यापुढेही असेलच. त्यामुळे ‘भव्य’चे स्वागत.‘भव्य’ योजनेचे तपशील जाहीर झालेले आहेत. ही योजना सहा वर्षांसाठी आहे. या योजनेत देशभरात १०० ठिकाणी ‘प्लग अँड प्ले’ तत्त्वावरील औद्योगिक पार्क विकसित करण्यात येणार आहेत. म्हणजे उद्योजकांना तयार स्थितीतील पायाभूत सोयीसुविधा मिळतील. जमिनींच्या मंजुरीसाठी खेटा घालणे टळेल. विविध सेवांसाठी इकडून तिकडे असे हेलपाटे मारावे लागणार नाहीत, असे सरकार म्हणते आहे. म्हणजेच नोकरशाहीचा जाच कमी होईल, अशी आशा बाळगता येईल. किमान १०० ते कमाल एक हजार एकर इतक्या क्षेत्रात ही पार्क उभारण्यात येणार असून, त्यासाठी केंद्राकडून प्रतिएकर एक कोटी रुपयांचे साह्य मिळणार आहे. ही पार्क कुठे स्थापायची याचा निर्णय स्पर्धात्मक पद्धतीने केला जाणार आहे. यातून सुमारे १५ लाख रोजगार निर्माण होतील, असा सरकारचा अदमास आहे. आजच्या काळातील हा प्रश्न महत्त्वाचा. नुकत्याच आलेल्या एका अहवालाने देशातील ४० टक्के पदवीधर बेरोजगार आहेत, यावर बोट ठेवलेले आहे. यावरून आजची रोजगार निर्मितीची निकड कळावी व ही योजना स्वागतार्ह का हेही उमजून यावे.पायाभूत सुविधा उभारण्याचा धडाका केंद्राने लावलेला असल्याचे दिसत असले तरी उद्योगांच्या विकासाच्या दृष्टीने तो पुरेसा नाही. अनेक ठिकाणी विजेसारखी मूलभूत गरजही पूर्णार्थाने भागवली जात नाही. प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता ही आणखी एक अडचण. त्यात भर विदेशी व तुलनेने स्वस्त अशा उत्पादनांनी उभ्या केलेल्या आव्हानाची. हे असे चित्र असल्याने गुंतवणूकदार चटकन पुढे येण्यास धजावत नाहीत, हे मोठे दुखणे आहे. शेजारच्या - अगदी चीनसकट - देशांना भारतात गुंतवणुकीसंदर्भात नुकत्याच काही सवलती जाहीर करण्यात आल्या. आपल्याकडील अनेकांच्या बाहूंमध्ये चीन म्हटले की स्फुरण चढते आणि जणू काही आत्ताच ते सीमेवर जाऊन चिनी सैनिकांशी लढतील, असा त्यांचा बाणा असतो. असे असताना, गुंतवणुकीबाबत शेजाऱ्यांना दिलेल्या सवलती या केंद्र सरकारच्या वास्ववादी दृष्टिकोनाचा परिचय देणाऱ्या आणि म्हणून योग्यच आहेत.भारत-अमेरिका यांच्यातील स्थगित झालेला व्यापार करार, धगधगते आखात अशा आंतरराष्ट्रीय पटलाच्या पार्श्वभूमीवर ‘भव्य’ची घोषणा झालेली आहे, हे लक्षात घ्यायला हवे. हा सगळा पट ध्यानात घेत असताना सन २००५मध्ये आलेल्या ‘एसईझेड’ (विशेष आर्थिक क्षेत्र) योजनेचेही स्मरण होणे अनिवार्य. सन २००५मध्ये या संदर्भातील कायदा झाल्यानंतर प्रारंभी त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. मात्र नंतर करसवलती मागे घेण्यात आल्या नि उद्योग क्षेत्रही त्यातून मागे हटू लागले. मूळ ‘एसईझेड’ कायद्याची जागा घेणारे ‘देश’ हे विधेयक सुमारे चार वर्षे रखडले आहे. अगदी आत्ताच, ‘एसईझेड’ योजनेचा आढावा घेण्यासाठी व त्याच्या दुसऱ्या टप्प्यातील आराखडा ठरवण्यासाठी केंद्राने समिती स्थापली आहे. ‘भव्य’ची अंमलबजावणी करताना या आधीच्या घटनांतून (किंवा चुकांतून!) काही धडे मोदी सरकारला घेता येतील. हे सारे जमून आले तर देशाला ‘भव्य’त्वाची प्रचिती येण्याची आशा बाळगता येईल. ती तशी येवो, ही सदिच्छा.

# माजलगावात सैलानी बाबा संदल पालकी व यात्रा उरूसचे आयोजन

## भक्तांनी लाभ घेण्याचे यात्रा समितीकडून आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

शहराजवळील असलेल्या ढोरगाव-हिंगणवाडी शिवारात सैलानी बाबा यांचे दर्गा परिसर येथे दि. २२ मार्च रविवार रोजी सैलानी बाबा संदल व यात्रा उरूसचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ भक्तांनी घ्यावा असे आवाहन यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले आहे.या द्य्राच्या दर्शनासाठी जिल्हा व राज्यभरातून विविध जाती धर्मातील भाविकांची मोठी उपस्थिती दरवर्षी असते. सकाळी ९ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत भाविक भक्तांचि दर्शनासाठी आलोट गर्दी पाहायला मिळते. व तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. ढोरगाव हिंगणवाडी

शिवारात असलेल्या सैलानी बाबा यांच्या दर्गायात दरवर्षी पाडव्या नंतर तीन दिवसांनी संदलचे आयोजन करण्यात येते मागील अनेक वर्षापासून ही परंपरा सुरू आहे.मा. बाबुदादा राजेभाऊ गायकवाड यांच्या घरून दि. २२ मार्च रविवार रोजी सायंकाळी संदल बायपासने निघुन आंबेडकर चौकातून त्याच दिवशी रात्री ९.३० वाजता सैलानी बाबांच्या दर्गा येथे पोहचते. यूसुफ कादरी, आगा खाँन साहाब, शेख महेबुब, रईस बाबा कादरी, शेख मुस्तकीम बाबा, सय्यद रफीक कादरी, पुजारी परिवाराच्या व ईतर मान्यवरांच्या हस्ते सैलानी बाबा दर्गाह येथे यावर्षी चादर चढविण्यात येणार आहे. तसेच चादर चढवल्या नंतर सुप्रसिद्ध कव्वाल तौसिफ जुनैदी पुणे यांचा शानदार कव्वालीचा कार्यक्रम होईल. तसेच संदल निमित्त्य दर्शनास सर्व जनतेने यावे असे आवाहन सैलानी बाबा यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले आहे.



# पात्रुड नगरीत भक्तीचा मळा फुलला

## १९ व्या अखंड हरिनाम सप्ताहात ज्ञानेश्वरीताई बिगुल यांच्या भागवत कथेचे रसाळ निरूपण



दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पात्रुड येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाने गेल्या दोन दिवसांपासून पात्रुड नगरी भक्तीरसात न्हाऊन निघाली आहे. ह.भ.प. भगवान बाबा महाराज पात्रुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या १९ वर्षांची प्रदीर्घ परंपरा लाभलेल्या या सोहळ्यात यंदा श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून, प्रसिद्ध प्रवक्त्या ह.भ.प. ज्ञानेश्वरीताई बिगुल यांच्या ओघवत्या वाणीतून कथेचे अमृतपान भाविकांना मिळत आहे.कथेचे निरूपण करताना ज्ञानेश्वरीताई बिगुल यांनी मानवी जीवनातील भक्तीचे महत्त्व अत्यंत सोप्या आणि प्रभावी भाषेत मांडले. त्या म्हणाल्या की, श्रीमद भागवत कथा हा केवळ ग्रंथ नसून तो मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. आजच्या धावपळीच्या आणि दगदगीच्या युगात मानवाला खरी शांती केवळ अध्यात्मातच मिळू शकते. भक्तीमुळे अंत:करण शुद्ध होते आणि संकटांशी लढण्याची ताकद मिळते.

विवेचनादरम्यान त्यांनी विशेषतः तरुण पिढीवर होणाऱ्या संस्कारांवर भर दिला. ह.भ.प. भगवान बाबा महाराज पात्रुडकर यांच्या प्रेरणेतून आणि मार्गदर्शनातून १९ वर्षांपासून चालू असलेला हा ज्ञानयज्ञ म्हणजे गावच्या एकीचे आणि संस्कारांचे प्रतीक आहे, असे मार्मिक विचार त्यांनी व्यक्त केले. ताईंच्या रसाळ वाणीने आणि मधूनच गायलेल्या अभंगांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते. सप्ताहाच्या निमित्ताने पात्रुडमध्ये दररोज पहाटे काकडा आरती, विष्णूसहस्रनाम, सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण आणि सायंकाळी हरिपाठ असे कार्यक्रम पार पडत आहेत. टाळ-मृदंगाच्या गजाराने आणि 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'च्या जयघोषाने अवघा परिसर दुमदुमून गेला आहे. या सोहळ्यासाठी पात्रुडसह परिसरातील शेकडो भाविक स्त्री-पुरुष दररोज हजेरी लावत आहेत.

कोणताही खंड न पडता ही परंपरा जोपासणाऱ्या पात्रुड ग्रामस्थांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती, समस्त ग्रामस्थ आणि तरुण मंडळी विशेष परिश्रम घेत आहेत. येत्या काही दिवसांत या सप्ताहाची सांगता भव्य काल्याच्या कीर्तनाने आणि महाप्रसादाने होणार आहे.

# नंदुरबार एल सी बी चा थरार! मध्य प्रदेशातून येणारे डेथ डिलर जेरबंद; गावठी पिस्टलसह अल्पवयीन मुलगा ताब्यात

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेने एल सी बी अवैध शस्त्र तस्करीविरुद्ध धडाकेबाज कारवाई करत मोठी कामगिरी फत्ते केली आहे. मध्य प्रदेशातून गावठी पिस्टल घेऊन महाराष्ट्रात शिरणाऱ्या एका सराईत गुन्हेगारासह एका १६ वर्षीय विधीसंघर्ष बालकाला पोलिसांनी सापळा रचून बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईत विनापरवाना शस्त्र आणि मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, शहादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.१९ मार्च २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना एका खास गुप्त बातमीदाराकडून 'हॉट इनपुट' मिळाले होते. मध्य प्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील अरविंद निगवाले हा तरुण त्याच्या एका साथीदारासह काळया रंगाच्या एच.एफ. डिलक्स मोटारसायकलने बेकायदा शस्त्रे घेऊन जावदा रोडने शहाद्यात येणार असल्याची खात्रीशीर



माहिती मिळताच, पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या आदेशाने तात्काळ सापळा रचण्यात आला.मिळालेल्या माहितीनुसार, एलसीबीच्या पथकाने जावदा ते शहादा रोडवरील मंदाणे गावाबाहेर रात्रीच्या अंधारात मोर्चेबांधणी केली. काही वेळातच जावदा बाजूकडून एक संशयित मोटारसायकल (क्र. एम पी १० एम डब्लू ५१८२) येताना दिसली. पोलिसांनी सतर्कतेने गाडी थांबवून दोघांची चौकशी केली असता, चालकाने आपले नाव अरविंद देवराम निगवाले (वय २३, रा. उमर्टी, जि. बडवानी) असे सांगितले, तर मागे बसलेला मुलगा हा केवळ १६ वर्षांचा अल्पवयीन असल्याचे समोर आले.पोलिसांनी जेव्हा संशयित अरविंदची कसून अंगझडती घेतली, तेव्हा त्याच्या कमरेला लपवलेले एक लोखंडी गावठी बनावटीचे पिस्टल मिळून आले. शस्त्राबाबत परवान्याची विचारणा केली असता, दोघांकडेही कोणतेही कायदेशीर कागदपत्रे नव्हती. भरवस्तीत किंवा गुन्हेगारी कृत्यासाठी या शस्त्राचा वापर होणार होता का? याचा तपास आता पोलीस करत आहेत.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पथकाने केली:

पी.आय.: हेमंत पाटील

पी.एस.आय.: मुकेश पवार, विकास गुंजाळ

अंमलदार: पुरुषोत्तम सोनार, मोहन ढमढेरे, विकास कापुरे, शोएब शेख, भरत उगले, सतिश घुले.

दोघांविरुद्ध शहादा पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# गॅस टंचाईबाबत तहसीलदारांना निवेदन ; ललितकुमार जाट

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

सध्या जागतिक स्तरावर इस्रायल-इराण संघर्षामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा परिणाम देशातील घरगुती गॅस पुरवठ्यावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या संदेशांमुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली असून, अक्कलकुवा तालुक्यात गॅस सिलेंडरचा साठा करण्याची प्रवृत्ती वाढताना दिसत आहे.संदर्भात योग्यती उपाय योजना निर्गमित करण्याबाबत नंदुरबार लोकसभा युवासेना अध्यक्ष तथा खापर ग्रामपंचायत माजी उपसरपंच ललितकुमार जगदीश जाट यांनी दि. १७ मार्च २०२६ रोजी अक्कलकुवा येथील तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या जागतिक स्तरावर इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे आपल्या देशात घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरची टंचाई जाणवत आहे. सोशल मीडियावरील व्हिडिओमुळे नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण झाला असून, भविष्यातील परिस्थितीचा विचार करून नागरिक गॅस सिलेंडरचा साठा करत असल्याचे निदर्शनास येत आहे.अक्कलकुवा तालुक्यातील गॅस एजन्सी धारकांशी संपर्क साधून परिस्थिती जाणून घेतली असता, शासनाच्या



गाईडलाईननुसार नियोजन करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे. मागील कालावधीत मुबलक गॅस साठा उपलब्ध असल्याने कोणतीही अडचण आली नाही. मात्र सध्या पुढे सिलेंडर मिळणार की नाही, या भीतीमुळे एकाच कुटुंबातील ग्राहकांकडून त्यांच्या कनेक्शनच्या संख्येनुसार सिलेंडर बुकिंग केले जात असून,एका कुटुंबात एका वेळी अधिकचे सिलेंडर मिळत आहेत, तर इतर ग्राहकांना उशिरा मिळत आहेत. त्यामुळे अविश्वासाचे वातावरण निर्माण होत आहे.तसेच, अधिक माहिती घेतली असता खापर गावात मोठ्या प्रमाणावर बाहेरगावी राहत असलेल्या व्यक्ती आणि मृत व्यक्तींच्या नावावरील कार्डचा वापर अजूनही सुरू असल्याचे आढळून आले आहे. काही व्यक्तींकडे एकापेक्षा अधिक कनेक्शन असून, गरज नसतानाही गॅस बुकिंग करून इतर ग्राहकांची गैरसोय केली जात आहे. त्यामुळे गॅस टंचाई निर्माण होत असून, त्यातील काही जण शेजारीपाजारींना मदत न करता सिलेंडर काळ्या बाजारात वाहन चालकांना व हॉटेल मालकांना जास्त दराने विक्री करत आहे.या प्रकारामुळे गॅस एजन्सी, प्रशासन आणि काही अंशी लोकप्रतिनिधींनाही सामान्य नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. या संपूर्ण परिस्थितीचा विचार करून नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे असेही नमूद केले आहे की, एका घरात राहत असलेल्या व्यक्तीकडे एकापेक्षा अधिक कनेक्शन असल्यास तात्पुरते कार्ड ब्लॉक करण्यात यावेत. तसेच गॅस एजन्सी धारक व पुरवठा विभाग अथवा स्थानिक महसूल अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात की, एका कुटुंबातील व्यक्तींनी वेगवेगळे कनेक्शन घेऊ नयेत. बाहेरगावी राहत असलेल्या व्यक्तींच्या नावावरील कार्डवर सध्याच्या परिस्थितीत सिलेंडर देऊ नयेत, तसेच मृत व्यक्तींच्या नावावरील कार्डवरही सिलेंडर देणे बंद करावे.तसेच, आवश्यक असल्यास सिलेंडर वाटपावेळी पुरवठा विभागाचे अधिकारी किंवा पोलिस अधिकाऱ्यांची उपस्थिती ठेवावी. ज्या ग्राहकांच्या कार्डवरून घेतलेला सिलेंडर काळ्या बाजारात आढळून येईल,त्या कार्डधारकांचे कनेक्शन रद्द करण्यात यावे,अशी मागणीही करण्यात आली आहे.

## कष्टाच्या कामांपासून मजुरांचा काढता पाय

# नोकरीपेक्षा साल जास्त, सुविधा भारी तरी 'गडी' मिळेना!

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**

पाडवा म्हटला की, नवीन वर्षाची सुरुवात आणि शेतकऱ्यांसाठी सालगडी बदलण्याची किंवा जुना करार नूतनीकरण करण्याची परंपरा. मात्र, यंदा पाडव्याच्या तोंडावरच शेतकऱ्यांची मोठी अडचण उभी राहिली आहे. एक ते सव्वा लाख रुपये साल, राहायला घर, मोफत वीज-पाणी, वर्षभराचं धान्य आणि शेतातील भाजीपाला अशी सर्व सुविधा देऊनही सालगडी मिळत नसल्याने बळीराजा मेटाकुटीला आला आहे.

किनवटसह तेलंगाना विदर्भातून मोठ्या प्रमाणात सालगडी यायचे. शेतीची कामे सांभाळण्यासाठी हीच मुख्य मजूरशक्ती होती. मात्र, आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. परिणामी, शेतात दिवसभर राबणाऱ्या कामांकडे मजुरांनी पाठ फिरवली आहे. बागायती शेती करणाऱ्या आणि मोठ्या जमिनी असलेल्या शेतकऱ्यांना सालगडी ठेवणे अपरिहार्य आहे. अशा शेतकऱ्यांसमोर सध्या सर्वात मोठे संकट म्हणजे, गडी कुठून आणायचा? मागील वर्षी एक लाख रुपये घेणारा सालगडी सव्वा लाखाची मागणी करत आहे. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे.

सध्या सालगडीला एक लाख साल दिले जात आहे. यासोबतच एका कुटुंबाला वर्षभर पुरेल इतके ज्वारी, गहू आणि डाळ दिली जाते. शेतात राहण्यासाठी स्वतंत्र खोली किंवा टीनशेड उभारून दिले जाते. वीज, पाणी, सरपण यांचा कोणताही खर्च सालगडीला करावा लागत नाही. शेतातील भाजीपाला देखील वापरण्यास मोकळीक असते.

दुसरीकडे, पुणे-मुंबईसारख्या शहरांमध्ये दहा ते पंधरा हजार रुपयांच्या पगारावर काम करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यांना घरभाडे, वीज-पाणी, अन्न यासाठी वेगळा खर्च करावा लागतो. तरीदेखील तरुणांचा ओढा शहरांकडेच आहे. कष्टाची कामे टाळण्याकडे त्यांचा कल वाढत आहे.

शहरात कमी पगार असला तरी कामान ठरलेले तास, सुट्टीची हमी आणि तुलने कमी शारीरिक कष्ट ही कारणे मजुरांन आकर्षित करत आहेत. शेतीतील अनिश्चितता, हवामानाचा ताण आणि दिवसभराचे कष्ट यामुळे अनेक जण सालगडी होण्यापेक्षा शहरातील नोकरीला प्राधान्य देत आहेत.

दरम्यान, शेतीत आता हायटेक सालगडी असेल, तर त्यांना अधिकचे साल देवून त्यांची डिमांड वाढत आहे-केवळ कष्टकरी गडी पुरेसा राहत नाह ट्रॅक्टर चालवता येणे, मोटार रिमोटने चालू-बंद करणे, खत व कीटकनाशकांचे ज्ञान असणे आणि मोबाइल हाताळता येणे या गोष्टी आवश्यक ठरत आहेत. अशा गड्यांना अधिक साल देण्याची तयारी शेतकरी दाखवत आहेत.



## बोरदचे 'लोकदूत' डॉ.अनिल धनगर यांच्याकडून सामाजिक बांधिलकी; विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे बळ

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

केवळ व्यवसायाने डॉक्टर नसून खऱ्या अर्थाने समाजसेवक म्हणून ओळख निर्माण केलेले आणि बोरद गावासाठी नेहमीच 'देवदूत' ठरलेले डॉ. अनिल धनगर यांनी पुन्हा एकदा आपल्या दातृत्वाचा परिचय दिला आहे. पुण्यश्लोक मल्हारराव होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांनी जिल्हा परिषद कन्या शाळा क्रमांक २ मधील १८ गुणवंत व गरजू विद्यार्थिनींना स्वखर्चातून शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.डॉ. अनिल धनगर यांचे कार्य केवळ यंदाच्या साहित्य वाटपापुरते मर्यादित नाही. बोरद ग्रामस्थांच्या मनात त्यांच्याबद्दल आदराचे स्थान असण्याचे मुख्य कारण म्हणजे संकटकाळात त्यांनी दिलेली साथ. मग तो भयावह 'कोरोना' काळ असो वा 'चिकनगुनिया' सारख्या आजाराने गावाला



ग्रासलेले दिवस असोत, डॉ. धनगर यांनी जिवाची पर्वा न करता अहोरात्र सेवा दिली. आजाराने खचलेल्या रुग्णांसाठी ते अक्षरशः 'देवदूत' बनून धावले, ही भावना आजही प्रत्येक ग्रामस्थाच्या ओठी आहे.

ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला गती मिळावी आणि त्यांच्या स्वप्नांना बळ मिळावे, या उदात्त हेतूने डॉ. धनगर दरवर्षी न विसरता वह्या-पुस्तकांचे वाटप करतात. इयत्ता १ ली ते ४ थी मधील विद्यार्थिनींना वह्या आणि पेन देऊन त्यांनी केवळ मदत केली नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे समाजातील इतर घटकांनाही समाजसेवेची प्रेरणा मिळत आहे.गावात राबविल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांमुळेच आज डॉ. अनिल धनगर यांच्या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे. सध्या ते अखिल भारतीय स्तरावरील विविध सामाजिक संस्थांमध्ये महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असून, त्यांच्या या नेतृत्वाचा फायदा थेट समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी बोरद कन्या शाळेचे मुख्याध्यापक लोटन रामदास वाल्हे, उपशिक्षक कमल भालचंद्र पाटील, भगतसिंग राज्या वळवी, मीनाक्षी दत्तू मकवाना, वसंत मानसिंग पराडके आणि आशा विरसिंग वळवी उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांनी डॉ. धनगर यांच्या कार्याचे मनापासून अभिनंदन केले.

## आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने केज येथे दोन दिवसीय प्रशिक्षण



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह येथे आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने केज येथे दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले. शेळीपालन ,कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय प्रशिक्षण संपन्न,या प्रशिक्षणामध्ये शेळ्यांचे आजार, उपचार लषिकरण,चारा व्यवस्थापन शेड व्यवस्थापन, तसेच शासनाच्या वेगवेगळ्या योजना, त्यासाठी लागणारी कागदपत्रे प्रोजेक्ट रिपोर्ट नमुना शासकीय योजनांची किट अनुभव प्रमाणपत्र, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी देण्यात आले यामध्ये आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्राचे मुख्याधिकारी राजेंद्र कांबळे,प्रकल्प अधिकारी निलेश मोटे, डॉ गणेश गवळी, तज्ञ प्रशिक्षक जयंत कांबळीकर आदींची उपस्थिती होती पशुसंवर्धन प्रशिक्षणासाठी पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ थळकरी यांनी मार्गदर्शन केले.प्रशिक्षणात तालुकाभरातून शेतकरी,युवक यांनी प्रशिक्षण पूर्ण केले.

## नवोदय परीक्षेत शेठ के.डी.हायस्कूलचा 'सिद्धार्थ' चमकला ९२ टक्के गुणांसह अक्कलकुवा नवोदय विद्यालयात निवड!

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा येथील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या 'शेठ के. डी. हायस्कूल' च्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. विद्यालयाचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी कु. सिद्धार्थ वनसिंग वसावे याने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. सिद्धार्थने या परीक्षेत ९२ टक्के गुण प्राप्त करून अक्कलकुवा येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या निवड यादीत आपले स्थान निश्चित केले आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवणे हे कठीण आव्हान मानले जाते. मात्र, सिद्धार्थने अत्यंत चिकाटीने आणि नियोजित कष्टाने या परीक्षेची तयारी केली होती. त्याच्या या यशामुळे केवळ वसावे कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण तळोदा



> सिद्धार्थ हा मुळातच कष्टाळू आणि जिज्ञासू विद्यार्थी आहे. त्याच्या या यशामुळे आमच्या शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर शिक्कामोर्तब झाले आहे. इतर विद्यार्थ्यांनीही सिद्धार्थचा आदर्श घेऊन अशा स्पर्धा परीक्षांकडे वळावे, यासाठी ही निवड नक्कीच दिशादर्शक ठरेल.
> – मुख्याध्यापक जे. एल. सूर्यवंशी

शहराचा अभिमान वाढला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सिद्धार्थचे हे यश अत्यंत प्रेरणादायी ठरले असून, परिसरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**शाळेचे दर्जेदार मार्गदर्शन**

सिद्धार्थच्या या यशात शेठ के. डी. हायस्कूलच्या शैक्षणिक गुणवत्तेचा मोठा वाटा आहे. मुख्याध्यापक जे. एल. सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक जे. एन. माळी आणि पर्यवेक्षक पी. पी. पाटील यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली सिद्धार्थने परीक्षेची तयारी केली. शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षिकांचे त्याला वेळोवेळी लाभलेले प्रोत्साहन आणि शाळेतील स्पर्धात्मक वातावरणामुळेच हे यश साध्य करता आले, अशा भावना व्यक्त होत आहेत. सिद्धार्थच्या या यशाबद्दल त्याचे पालक, शिक्षक आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## गोवंश तस्करीवर गडचांदूर पोलिसांचा दणका; ६.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक वादळ वार्ता**
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गडचांदूर ते पिंपळगाव मार्गावर गोवंशीय जनावरांची अवैधरित्या वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती १७ मार्च रोजी गडचांदूर पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे ठाणेदार शिवाजी कदम यांच्या नेतृत्वात पोलिसांनी तात्काळ नाकेबंदी करून संशयित बोलेरो पिकअप वाहन थांबविले.

वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये तब्बल ९ गोवंशीय जनावरे (बैल) निर्दयपणे कोंबून वाहतूक करताना आढळून आली. पोलिसांनी तत्काळ जनावरांना ताब्यात घेऊन त्यांना प्यार फाउंडेशन गोशाळा, चंद्रपूर येथे सुरक्षित पाठविले.या कारवाईदरम्यान मो. आमीन मो. शब्बीर शेख (वय २५, रा. घुग्घुस, जि. चंद्रपूर) याला अटक करण्यात आली असून त्याचा एक साथीदार फरार झाला आहे.




आरोपीकडून अंदाजे १ लाख ८० हजार रुपये किंमतीची ९ गोवंशीय जनावरे तसेच चक/३४/इन/५६१९ क्रमांकाचे सुमारे ५ लाख रुपये किंमतीचे पिकअप वाहन असा एकूण ६ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास गडचांदूर पोलीस करीत आहेत.सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, तसेच डउ्‌झज रवींद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार शिवाजी कदम यांच्या नेतृत्वात पोलीस पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.या धडाकेबाज कारवाईमुळे परिसरातील गोवंश तस्करांचे धाबे दणाणले असून पोलिसांच्या सतर्कते तर कौतुक होत आहे

# देगलूर पोलिस स्टेशन: ऑपरेशन फ्लॅश आऊटने अवैध धंदे उधळले,गुन्हेगारांना अटक

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे झठएडड छजढए दिनांक १८/०३/२०२६ देगलुर पोलीसांनी अवैद्य गुटखा वाहतुक करणा-या आरोपीस मोटारसायकल सह ताब्यात घेवून एकुण ९०,६५०/-रुपये चा मुद्देमाल केला जप्त. देगलुर माहीती कशी प्राप्त झाली गोपनीय गु.र.नं. कलम १४५/२०२६ कलम १२३, २७४, २७५,२२३ इछड सह कलम २६ (२), २७, २३, ३०(२)(३), ५९ (४) अन्न सुरक्षा मा. न. के. कायदा गुन्हा दाखल ता. व वेळ दिनांक १८/०३/२०२६ रोजी चे १९.५० वाजता फिर्यादीचे नाव व पत्ता राजवंतसिंघ सुरजितसिंघ बुंगई, वय ३८ वर्षे, व्यवसाय नोकरी पोकॉ/३१४१ नेमणुक पोलीस ठाणे देगलुर, ता. देगलुर, जि. नांदेड. गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाण दिनांक १८/०३/२०२६ रोजी १६.५० वा.चे शहापुर गावाजवळ मुख्य रस्त्यावर सुजायतपुर जाणारे पॉईंट येथे रोडवर ता. देगलुर गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड. मा.श्री.सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड. मा.श्री.संकेत गोसावी, उपविभागीय पोलीस अधिकारी, देगलुर. यांचे मार्गदर्शनाखाली श्री मारोती श्रीराम मुंडे, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, देगलुर. श्री महाजन मैसनवाड पोलीस उप निरीक्षक पोलीस स्टेशन, देगलुर. पोहेकॉ/६१० चंद्रकांत भाग्यवंत, पोहेकॉ / २६४० किरणकुमार वाघमारे, पोकॉ / २७४ शिवाजी आडबे, पोकॉ/२८५१ वैजनाथ मोटरगे, सर्व नेमणुक पो.स्टे देगलुर. आरोपीचे नाव व पत्ता बालाजी माधवराव नलबले, वय ३४ वर्ष व्यवसाय किराणा दुकान रा. शहापुर ता. देगलुर जि.नांदेड १) सागर पान मसाला असे नाव असलेले २० पुडे एकुण २८००/- रुपये चा माल. जप्त मुद्देमाल २) डठ-१सुगंधीत तंबाकू असे नाव असलेले २० पुडे एकुण २८००/- रुपये चा माल. ३) केशर युक्त विमल पान मसाला असे नाव असलेले १० पुडे एकुण १२००/- रुपये चा माल. ४) त-१ ढजइ-उउज असे नाव असलेले १० पुडे एकुण ३००/- रुपये चा माल. ५) रजनीगंधा पान मसाला असे नाव असलेले ०३ बॉक्स एकुण १६२०/- रुपये चा माल. ६) मिराज कीर कोकील छाप तंबाकू २ बॉक्स एकुन ४५०/- रुपये चा माल. ७) राजनिवास सुगंधीत पान मसाला असे नाव असलेले ०५ पुडे एकुण १०००/- रुपयाचा माल. ८) नछ-०१ जाफरानी जर्दा असे नाव असलेले ०५ पुडे एकुण ४८०/- रुपयाचा माल. ९) एक काळ्या रंगाची पॅशन प्रो मोटारसायकल क्र. चक२६ इझ ५९८९ जुनी वापरती कि. अंदाजे ८०,०००/-रु. एकूण ९०,६५०/- रुपये. गुन्हयाची हकीकत मा.श्री.अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश ऑउट अंतर्गत अवैद्य धंद्यावर कार्यवाही करण्याबाबत व गुन्हे उघडकीस आणे बाबत पोलीस निरीक्षक, देगलुर यांना आदेशीत केले होते. त्यानुसार श्री.मारोती श्रीराम मुंडे पोलीस निरीक्षक, देगलुर यांनी गुन्हे शोध पथकातील अधिकारी अंमलदार यांना देगलुर शहरात व पोलीस स्टेशन हद्दीत अवैद्य धंद्याची माहीती काढून केसेस करणेकरीता रवाना केले. गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार देगलुर हद्दीत अवैद्य धंद्याची माहीती काढत शहापुर ता. देगलुर येथे आले असता शहापुर गावाजवळ सुजायतपुर पाटी येथे रोडने एक काळ्या रंगाची पॅशन प्रो मोटारसायकल क्र. चक२६ इझ ५९८९ आली व त्यावर एक पोते संशईत रित्या मिळुन आले. गाडीचा चालक नामे बालाजी माधवराव नलबले, वय ३४ वर्ष व्यवसाय किराणा दुकान रा. शहापुर ता. देगलुर




जि.नांदेड यास थांबवून त्याचे मोटारसायकलवर असलेल्या पोत्याची तपासणी केली असता सदर पोत्यामध्ये मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व राज्य शासनाने प्रतिबंधित घातलेले अन्नपदार्थ १) सागर पान मसाला असे नाव असलेले २० पुडे एकुण २८००/- रुपये चा माल. २) डठ - १ सुगंधीत तंबाकू असे नाव असलेले २० पुडे एकुण २८००/- रुपये चा माल. ३) केशर युक्त विमल पान मसाला असे नाव असलेले १० पुडे एकुण १२००/- रुपये चा माल. ४) त-१ ढजइ-उउज असे नाव असलेले १० पुडे एकुण ३००/-रुपये चा माल. ५) रजनीगंधा पान मसाला असे नाव असलेले ०३ बॉक्स एकुण १६२०/- रुपये चा माल. ६) मिराज कीर कोकील छाप तंबाकू २ बॉक्स एकुन ४५०/- रुपये चा माल. ७) राजनिवास सुगंधीत पान मसाला असे नाव असलेले ०५ पुडे एकुण १०००/- रुपयाचा माल. ८) नछ-०१ जाफरानी जर्दा असे नाव असलेले ०५ पुडे एकुण ४८०/- रुपयाचा माल असा एकुण १०,६५०/- रुपये चा मुद्देमाल व सदरचा माल वाहतुक करणारी एक पॅशन प्रो. मोटारसायकल क्र. चक२६ इझ ५९८९ कि.अं.८०,०००/- ची असा एकुण ९०,६५०/- रुपयाचा माल जप्त करुन नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगीरी बद्दल मा. अबिनाश कुमार पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक करुन अभिनंदन केले आहे. जनसंपर्क अधिकारी पोलीस अधिक्षक, कार्यालय नांदेड.

# मोलगीत गुढी पाडव्याच्या निमित्ताने भूमी सुपोषण कार्यक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे या वर्षीही गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर भूमी सुपोषणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आला. मोलगी परिसर सेवा समितीच्या संकल्पनेतून मोलगी गावांतील शेतकरी गट बाबा विटला यांच्या सह अक्षय कृषी परिवार आणि रीड्स भारत यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमातून.शेतकऱ्यांनी आपल्या शेतीची,मातीची, नैसर्गिक संसाधनाचे महत्त्व शेतकऱ्यांना करून देणे व आपल्या कुटुंबा सह शेतीचे, पशुधनाच्या आरोग्यासाठी आराधना करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.मोलगी गावातील ओलीदोपाडा,ओलमीटेम्बा व टोनबारा पाडा येथील शेतकऱ्यांनी पाडव्याला एकत्र येऊन नवीन वर्षाच्या सुरुवातीला या वर्षी खरीप हंगामातील नियोजनावर चर्चा करण्यात आली.आपली माती,जंगल,पाणी कसे वाचवता येईल आपल्या पुढील पिढी साठीचे नैसर्गिक संकटे कशी येतील यावर विचार करण्यात आला.आणि शेतकऱ्यांची पूर्ण शेती ज्यांच्या वर अवलंबून आहे त्या औजाराचे म्हणजे नांगराचे व प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील आणलेली माती एकत्र करून त्यावर कलश ठेऊन पूजा करण्यात करून कार्यक्रमात आलेल्या प्रत्येकाला रोता बाबा यांनी पाती देऊन प्रसाद देऊन पूजा करण्यात आली.की नवीन वर्षांत आपल्या शेतातील उत्पन्न,जल,जंगल,माती,पाणी जतन,पशुधनाचे आरोग्य,चांगले रहावे आणि शेती समृध्दीसाठी ही पूजा व भूमी सुपोषण कार्यक्रम शेतकरी गटांकडून घेण्यात आला.शेतकरी आपल्या शेतीतीत अधिक उत्पन्नाच्या लालसेने खूप मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांचा व कीटक नाशकांचा वापर करत असल्याने जामीनितील पोषक घटक पूर्ण पणे नाहीसे झाले आहेत.बिना खताचे आता शेतीतील उत्पन्न शक्य नाही.अशा परिस्थितीत जमिनीतील पोषक घटक निर्मितीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.तसेच जंगल वाढीसाठी प्रयत्न व्हावे म्हणून मागील चार वर्षा पासून मोलगी परिसर सेवा समितीने आपल्या परिसरातील शेतकऱ्यांसोबत जमीनीची/मृदा संरक्षणासाठी गुढीपाडव्याला भूमी सुपोषण हा जागरणाचा विषय दर वर्षी घेत आहे.या कार्यक्रमातील पूजा विधी ही पुजारी रोता बाबा,व काल्या वसावे यांनी केली,या कार्यक्रमात शेतकरी गटाचे अध्यक्ष दामा वसावे,सचिव रतीलाल वसावे,धर्मा वसावे,जालमा वसावे,जेठ्या वसावे,उत्तम वसावे,गुलाबसिंग वसावे,सुनील वसावे,रामसिंग वसावे,हुण्या भगत,मांगा वसावे,दामा वसावे,बाबू तडवी,कालुसिंग वसावे,रमेश वसावे,पंडित वसावे विकास,सागर,सुनील,राजेश,विजय,चंद्रसिंग,दीपक, कांतीलाल,अमरसिंग,राकेश, ईश्वर,मगन, मनोज,संदीप, त्याच प्रमाणे महिला सुरतीबाई वसावे, सोनीबाई वसावे,मथुराबाई, सुन्नांती बाई,शिवलीबाई, दितुबाई,इंदिराबाई,ज्योतीबाई ,सीमाबाई,सुमित्राबाई,दुर्गा, लक्ष्मी,अंकिता, जयश्री,आदि उपस्थित होते.त्याच प्रमाणे मोलगी परिसर सेवा समितीचे मनोहर पाडवी, आपसिंग वसावे, सुनील वसावे,देवीसिंग तडवी,सायसिंग तडवी,नटवर वसावे,रमेश पाडवी, संदिप वसावे,विरसिंग वसावे,अशोक वसावे,जगन वसावे,किल्या वसावे,साया वसावे,सारपा वसावे,मोयला वसावे,गोवल्या वसावे,ईश्वर तडवी,मोगीला वसावे,पुष्पा वळवी, रमेश पाडवी,ईश्वर तडवी,गुरुजी तडवी उपस्थित होते.यावेळी भूमी सुपोषणाचे महत्त्व शेतकऱ्यांना सांगण्या आले व भुमी सुपोषणाची प्रतिज्ञा करून शेवटी धरती मातेचे, कुलदेवतेचे,भारत मातेचे वंदन आणि जय घोष करून कार्यक्रम संपन्न झाला.




# माणुसकीचा जिवंत नमुना!

## पत्रकार वैभव स्वामीने वाचवले नालीत अडकलेले गायीचे वासरू

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील डॉक्टर गिरी हॉस्पिटल परिसरात घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेत माणुसकीचा जिवंत नमुना पाहायला मिळाला. नालीत पडलेल्या गाईच्या वासराला वाचवण्यासाठी सर्वसामान्य नागरिक फक्त बघ्याची भूमिका घेत असताना, पत्रकार वैभव स्वामी यांनी धाडस दाखवत त्या वासराचे प्राण वाचवले. त्यांना पेपर वाटप करणाऱ्या कैलास नामक युवकाने नालीत उतरून गाईचे वासरू बाहेर काढण्यासाठी मदत करत मोठ्या हिमतीचे आणि धाडसाचे काम करत वासराचे प्राण वाचवले.

मिळालेल्या माहितीनुसार, एका गाईचे वासरू चुकून रस्त्यालगत असलेल्या नालीत २० मार्च २०२६ रोजीच्या पहाटे जन्मल्या जन्मल्या पडले होते. नालीच्या शेजारी गाईने नवजात वासराला जन्म दिला. मात्र चुकून वासरू उठून उभा राहण्याचा प्रयत्न करत असताना अंधारात पहाटेच्या वेळी ते नवजात जन्मलेले वासरू पाय घसरून गुडघाभर खोल असलेल्या नालीत पडले.ते बाहेर



पडण्यासाठी झगडत असताना अनेक भटकी कुत्री त्याच्यावर हल्ला करण्याच्या तयारीत होती. त्या वेळी गाईनेही आपल्या वासराला वाचवण्यासाठी कुत्र्यांशी झुंज देण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी जमली होती. मात्र, गाय हल्ला करेल किंवा कुत्रे चावतील या भीतीमुळे कोणीही पुढे जाण्याचे धाडस करत नव्हते. या गंभीर परिस्थितीत पत्रकार वैभव स्वामी यांनी कोणतीही भीती न बाळगता पुढाकार घेतला. त्यांच्या मदतीला पेपर लाईन करत असलेल्या कैलास नामक युवक पुढे आला. त्याने खाली नालीत उतरून जखमी अवस्थेतील नवजात गाईचे वासरू अलगद बाहेर काढत वैभव स्वामी यांच्या हातात दिले.त्यांनी ते वासरू मोठ्या हिमतीने उचलून अंगावर धावून येणाऱ्या गाईजवळ सोडले.त्यानंतर त्या गाईने वासराला जवळ घेत आपलंसं केलं. पण ते वासरू नालीत पडल्यामुळे जखमी झालेलं होतं .त्याच्या पायातून पाठीतून रक्त निघत होतं. म्हणून त्यावेळी प्रसंगावधान राखून वैभव स्वामींनी तात्काळ डॉक्टरांना बोलावून अर्धा एक तास थांबून त्याच्यावर योग्य ते उपचार करून त्याचे प्राण वाचवले.

वैभव स्वामी यांच्या या धाडसी कृतीमुळे वासराचे प्राण वाचले आणि उपस्थितांनी सुटकेचा निश्वास टाकला.या घटनेमुळे माणुसकी अजून जिवंत आहे याची प्रचिती पुन्हा एकदा आली असून, पत्रकार वैभव स्वामी यांच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने केज येथे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीर संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह येथे आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने केज येथे दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यातआले.शेळीपालन, कुक्कुटपालन,दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण संपन्न झाले.या प्रशिक्षणामध्ये शेळ्यांचे आजार,उपचार लसीकरण,चारा व्यवस्थापन शेड व्यवस्थापन,तसेच शासनाच्या वेगवेगळ्या योजना,त्यासाठी लागणारी कागदपत्रे प्रोजेक्ट रिपोर्ट नमुना शासकीय योजनांची किट अनुभव प्रमाणपत्र, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी देण्यात आले. यामध्ये आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्राचे मुख्याधिकारी राजेंद्र कांबळे,प्रकल्प अधिकारी निलेश मोटे, डॉ.गणेश गवळी,तज्ञ प्रशिक्षक जयंत कांबळीकर आदींची उपस्थिती होती.पशु संवर्धन प्रशिक्षणासाठी पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. थळकरी यांनी मार्गदर्शन केले.प्रशिक्षणात तालुका भरातून शेतकरी,युवक यांनी प्रशिक्षण पूर्ण केले.

# संबोधी भालेराव नवोदय विद्यालय प्रवेशास पात्र



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील माळेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थीनी संबोधी किशोर भालेराव ही जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा देऊन प्रवेशास पात्र ठरली आहे या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.या यशाबद्दल अक्षर परिवाराचे विष्णू यादव, महादेव ढाकणे,विक्रम डोईफोडे,गीता अंडील, युवराज हिरवे, डॉ.हनुमंत सौदागर, बिभीषणमोहिते, सतीश देशमुख, विनायक आवाड,अण्णा कदम,तुषार पाटील,दया खोपे,जयदीप देशमुख, प्रकाश कांबळे,प्रशांत कांबळे,एच.के.कांबळे, बाळासाहेब बचूटे, महादेव कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# ईदच्या पावन पर्वानिमित्त केजमध्ये बंधुभावाचा संदेश,शेर-ऐ-हिंद हजरत टिपू जयंती उत्सवकमिटी कडून नागरिकांना हार्दिक शुभेच्छा

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्या नंतर साजरा होणाऱ्या ईद-उल-फित्र या आनंद दायी सणानिमित्त केज शहरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. या मंगलमय प्रसंगी शेर-ऐ-हिंद हजरत टिपू जयंती उत्सव कमिटी, केज यांच्या वतीने सर्व मुस्लिम बांधवांसह सर्व धर्मीय नागरिकांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.कमिटीचे प्रमुख सदस्य ईरफान पठाण,अमन पठाण, नासेर तांबोळी,साहिल तांबोळी,इम्रान सय्यद, वाहेद तांबोळी यांनी एकत्र येत ईद हा केवळ एक धार्मिक सण नसून, तो प्रेम,बंधुभाव आणि एकतेचा संदेश देणारा सण आहे,असे सांगत समाजात शांतता आणि सौहार्द टिकवण्याचे आवाहन केले आहे.

ईदच्या दिवशी मुस्लिम बांधव मशिदीत जाऊन विशेष नमाज अदा करतात,तसेच एकमेकांना आलिंगन देत 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा देतात.गरीब आणि



गरजू लोकांना जकात आणि फित्रा देऊन समाजातील समानतेचा संदेश दिला जातो.या सर्व परंपरांमुळे ईद हा सण समाजातील बंधुभाव अधिक दृढ करणारा ठरतो. कमिटीच्या वतीने देण्यात आलेल्या संदेशात नमूद करण्यात आले आहे की, आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात अशा सणांच्या माध्यमातून माणसा माणसांतील नाते अधिक घट्ट करण्याची गरज आहे.सर्वांनी मिळून प्रेम, सहकार्य आणि एकतेने राहावे,हीच खरी ईदची शिकवण आहे.केज शहरातील विविध भागांमध्ये ईद निमित्त सजावट करण्यात आली असून,बाजारपेठा गजबजलेल्या दिसत आहेत.नवीन कपडे,गोड पदार्थ आणि एकमेकांना भेटवस्तू देण्याचा आनंद नागरिक घेत आहेत. लहान मुलांमध्ये विशेष उत्साह असून,त्यांनी या सणाचा आनंद मोठ्या जल्लोषात साजरा केला.शेवटी,शेर-ऐ-हिंद हजरत टिपू जयंती उत्सव कमिटी,केज यांनी सर्वांना सुख,समृद्धी आणि आरोग्यदायी जीवनाच्या शुभेच्छा देत, आपल्या सर्वांच्या आयुष्यात आनंद,शांती आणि यश लाभो,अशी प्रार्थना केली आहे.ईद मुबारक!

# गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर 'स्वरांजली संगीत विद्यालय'चे जल्लोषात उद्घाटन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरात गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर दि.१९ रोजी 'स्वरांजली संगीत विद्यालय'चा उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला.सांस्कृतिक जाणीवा जपणाऱ्या या नव्या उपक्रमामुळे केज परिसरात संगीत शिक्षणाला नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.या सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी केज नगरपंचायती च्या नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड या होत्या.त्यांच्या हस्ते विधिवत रिबीन कापून विद्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हारुणभाई इनामदार यांचीउपस्थिती कार्यक्रमाला लाभली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस च्या महिला तालुका अध्यक्षा सौ.शितलताई लांडगे,जिजाऊ ब्रिगेड च्या जिल्हाध्यक्षा



सौ. राधाताई सपकाळ,ज्येष्ठ पत्रकार व समाजसेवक प्रा.हनुमंत भोसले,महा वितरणचे विज सहाय्यक विष्णू तेलंग तसेच पोलिस उप निरीक्षक लांडगे साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थिती मुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.ज्येष्ठ पत्रकार धनंजय कुलकर्णी,दैनिक पार्श्वभूमीचे अभय जोशी, रंजीत घाडगे,विजय बिक्कड, अशोकसोनवणे, प्रदीप गायकवाड, पांडुरंग कसबे,अनिल ठोंबरे,संजीवन कोरडे यांच्यासह अनेक पत्रकारांनी या सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाला गौरव प्राप्त करून दिला. याशिवाय कला-क्रीडा विश्व समितीचे पदाधिकारी व सदस्य, तसेच परिसरातील नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.स्थानिक नागरिकांची उपस्थिती या उपक्रमाबद्दल असलेली उत्सुकता आणि प्रेम दर्शवत होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविकाने झाली.प्रा. रमेश सरवदे यांनीप्रभावी शब्दांत कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत 'स्वरांजली संगीत विद्यालय'च्या स्थापने मागील उद्देश स्पष्ट केला. त्यांनी संगीत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत, विद्यार्थ्यांना कला क्षेत्रात प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली.यावेळी स्वरमंडल संगीत विद्यालयाचे सर्वेसर्वा प्रा. राजकुमार ठोके सर यांचीही विशेष उपस्थिती होती.त्यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी संगीत क्षेत्रात करिअर घडवावे,असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात प्रा.रमेश सरवदे यांनी आपल्या सुरेल आवाजातून उपस्थित मान्यवर आणि प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमात सांगीतिक रंग भरला आणि वातावरण भारावून गेले.

एकूणच, स्वरांजली संगीत विद्यालयाच्या उद्घाटन सोहळ्याने केज शहरात सांस्कृतिक वातावरण निर्माण केले असून,या विद्यालयाच्या माध्यमातून अनेक नवोदित कलाकार घडतील,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# फर्दापूर पोलीस ठाणे परिसरात दहशत माजवणारा वानर अखेर जेरबंद; तीन जण जखमी

**दैनिक वादळ वार्ता**
**फर्दापूर । प्रतिनिधी**

फर्दापूर पोलीस ठाण्याच्या परिसरात मागील दोन-तीन दिवसांपासून दहशत माजवणाऱ्या वानराला अखेर अजिंठा वन विभागाच्या पथकाने पकडून जेरबंद केले. या वानराने पोलीस कर्मचाऱ्यासह तिघांना चावा घेऊन जखमी केले होते, त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, अजिंठा राखीव जंगलातून आलेला हा वानर फर्दापूर पोलीस ठाणे परिसरात वावरत होता. तो अचानक नागरिक व पोलीस कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावत जाऊन हल्ला करत होता. या हल्ल्यात संतोष उबाळे हे पोलीस कर्मचारी जखमी झाले असून, आणखी दोन नागरिकांनाही वानराने चावा घेतल्याची नोंद आहे.

सदर वानर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या रिसॉर्ट परिसरातही फिरताना दिसून आला होता. तसेच भारतीय पुरातत्त्व विभागाच्या निवासस्थानांमध्ये व पोलीस वसाहतीतही तो घुसून नागरिकांना त्रास देत होता. त्यामुळे पर्यटक आणि स्थानिक रहिवाशांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. भीतीमुळे शेतकरी आणि नागरिकांनी काही काळासाठी या परिसरातून ये-जा करणेही टाळले होते.

या पार्श्वभूमीवर फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल साबळे यांनी अजिंठा वन विभागाचे परिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांच्याशी संपर्क साधून मदत मागितली. त्यानंतर आज सकाळी वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.या पथकात वनपाल दीपक सोनार, वनरक्षक अशोक दांडगे, वनरक्षक डोके मॅडम, वनमजूर राजू झोंड, भास्कर शहाणे, शेख साजेद तसेच सामाजिक कार्यकर्ते योगेश महाकाळ यांचा समावेश होता. त्यांनी पिंजऱ्याच्या साहाय्याने मोठ्या प्रयत्नांनंतर वानराला सुरक्षितरित्या पकडले.पकडण्यात आलेल्या वानराला पुढील कार्यवाहीसाठी अजिंठा येथील वन विभागाच्या कार्यालयात नेण्यात आले असून, परिसरातील नागरिकांनी या कारवाईबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077